**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, NOV-DEC, 2020, VOL- 8/62*

# कोविड - १९ आणि शिक्षण (COVID - 19 and Education)

**राजेंद्र महादू आचार्य, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभागप्रमुख, द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव - रायगड. ४०२१०४*
*acharyarajendra584@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १) प्रस्तावना

जगभरातल्या लाखो लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला असून या विषाणूने खुप जणांचा बळी घेतला आहे. सन २०१९ मध्ये हा विषाणू चीनमधील वुहान या प्रांतामध्ये दिसून आला.१ त्यानंतर तो जगभर पसरायला सुरुवात झाली १३ मार्च २०२० नंतर याचा प्रभाव भारतातसुद्धा मोठ्या प्रमाणात दिसू लागला. यावर उपाय म्हणून लॉकडाऊन घोषित केले. विश्वाची गती टिपेला पोहचलेली असताना सारे काही बंद झाले. प्रगतीचे प्रतिक असलेले चाक थांबले. जलमार्ग, हवाईमार्ग, रस्ते - हमरस्ते, वाटा - पाऊलवाटा निर्जन झाले. या लॉकडाऊनचा खूप मोठा परिणाम लहान मोठ्या उद्योगधंद्यावर झाला. अनेकांच्या नोकऱ्याही गेल्या, ठप्प झालेल्या या अर्थव्यवस्थेमुळे हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांचे तांडे शहराकडून गावाकडे निघाले आहेत. 'उपासमारीने मरायचे की कोरोनामुळे?'२ या पेचात हा कष्टकरी वर्ग  अडकला आहे. त्यातच शाळा - महाविद्यालये देखील बंद करण्यात आले. अनेकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. अनेकांनी जवळची माणसे गमावली. डॉक्टर, नर्सेस, सफाई कर्मचारी, पोलीस यंत्रणा यांच्यावर कामाचा अतिरिक्त भार पडला. या कोरोनाशी दोन हात करण्यासाठी शस्त्र म्हणून मास्क, सोशल डीस्टंसिंग आणि सॅनिटायझर यांचा वापर वारंवार होऊ लागला. त्यामुळे कोरोना विषाणूची ही साथ दुसऱ्या महायुद्धानंतरचे जगासमोरचे मोठे संकट आहे. असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर या संकटाने प्रभाव टाकला आहे. या रोगाला अजून प्रतिजैविके न सापडल्यामुळे रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाययोजना करणे एवढाच आता सर्वांसमोर पर्याय आहे. म्हणून लॉकडाऊनचे धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा सर्व देशात प्रयत्न चालू आहे. या परिस्थितीत निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भीतीचे वातावरण पसरले आहे.

जागतिक व देशाच्या अर्थव्यवस्था लॉकडाऊनमुळे मंदी, बेरोजगारीच्या चक्रात अडकल्यामुळे डळमळीत होत आहे. चीन - अमेरिका यांच्या आर्थिक सत्तासंघर्षाला 'जैविक युद्धाचे' स्वरूप येत आहे का ? या भीतीने जग ग्रासले आहे. जागतिक सत्ताकेंद्र युरोप - अमेरिका खंडाकडून आशिया खंडाकडे सरकत आहेत. लॉकडाऊनमुळे येणाऱ्या सक्तीच्या रिकामेपणामुळे, एकटेपणामुळे कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**२) कोविड - १९ आजाराची दाहकता**

संपूर्ण जग कोरोनाच्या महासंकटाला सामोरे जात असताना जगात कोणत्याही वादाला अधिक वाव न देता तो कसा मिटवला जाईल यावर भर दिला जाणे हीच काळाची गरज होती. गेल्या वर्षाच्या अखेरीस चीनमध्ये मूळ धरणाऱ्या कोरोना महासाथीने यंदाच्या मार्च ते मे या तीन महिन्यांत जगभरात आपले हातपाय पसरले. तेव्हापासून कोरोना महासाथीचा समर्थपणे मुकाबला करणे हा जगातील प्रत्येक देशाचा अजेंडा महत्त्वाचा ठरू लागला आहे. सर्व देश, राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय संस्था आणि इतर महत्त्वाच्या संघटनांनी आपल्या समोरील सर्व तातडीची कामे बाजूला ठेवत कोरोना आव्हानाला प्रथम प्राधान्य दिले आहे. त्यातील काही देशांना कोरोना महासाथीला ताकतीने तोंड देता आले नाही म्हणून टीकेला सामोरे जावे लागत आहे. शिवाय त्या देशांमध्ये कोरोनाचा संसर्ग वाढू लागला आहे. एकूणच कोरोना महासाथीने जगातील मानवतेची परीक्षा घेतली आहे.

कोरोनाचे उगमस्थान असलेल्या चीनने या महामारीला आटोक्यात आणण्यासाठी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली. त्यासाठी काही विशिष्ट प्रदेशांवर कठोर बंदी घातली. लोकांच्या मुक्त हालचालींवर निर्बंध आणले. शहरांमध्ये टाळेबंदी लागू केली. म्हणून चीनमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आला. परंतु कोणत्याच निर्बंधाची सवय नसलेल्या युरोपियन नागरिकांनी हे आव्हान तितकेसे गांभीर्याने घेतले नाही. परिणामी युरोपात कोरोना झपाट्याने पसरला. त्याचा सर्वाधिक फटका बसला इटलीला, इटलीत कोरोनाचा समुहसंसर्ग झाला आणि पर्यटनावर आधारलेली अर्थव्यवस्था झपाट्याने घसरली. इटलीच्या वाताहतीने युरोपीय समुदायातील इतर देशांचे डोळे खाडकन उघडले. युरोपातील प्रत्येक देशाने इटलीपासून धडा घेत आपल्या देशातही कठोर निर्बंध अमलात आणण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम चांगला झाला आणि युरोपात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यात तेथील देशांना यश आले. मात्र असे असले तरी युरोपीय समुदायातील मोठ्या देशांना मोठा आर्थिक फटका बसला. परंतु त्यातून ते लवकर सावरले.

कोरोनामुळे अनेक देश त्रस्त झाल्यामुळे देशादेशांमधील आर्थिक आणि सामाजिक घडी विस्कटू लागली आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांची वीण उसवू लागली आहे. त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ लागले आहे. याबाबत जागतिक आरोग्य संघटनेचे (WHO) उदाहरण पुरेसे बोलके आहे. कोरोनाचे गांभीर्य ओळखण्यात ही संघटना कमी पडली, असा आरोप करत अमेरिकेने जागतिक आरोग्य संघटनेचा निधी रोखला आणि नंतर या संघटनेतूनच बाहेर पडण्याचा अमेरिकी नेतृत्वाने निर्णय घेतला. " जागतिक आरोग्य संघटनेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करणे गरजेचे आहे परंतु त्यात ही संघटना कमी पडली आहे "३ असा दावा करत अमेरिका जागतिक आरोग्य संघटनेमधून बाहेर पडली.

३) कोविड -१९ आणि शिक्षण-

संपूर्ण जगभरात कोरोना वायरसने धुमाकूळ घातलेला आहे. कोरोना वायरस या संकटाशी संपूर्ण जग सामना करीत आहे. कोरोनाविषाणू झपाट्याने वाढत असल्यामुळे ही सर्व परिस्थिती आवाक्यात आणण्यासाठी सर्व जगभर लॉकडाऊन सुरू करण्यात आले आहे. या संकटामुळे आपल्या सर्वांचेच आयुष्य अस्थिर झालेले आहे. कोरोना संकटाने सर्वांनाच ग्रासले आहे. लोकांचे व्यवहार, कामधंदे सर्व काही ऑनलाईन झाले आहे. कोरोना

विषाणूंचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्यासाठी व कोरोना साखळी खंडित करण्यासाठी देशभरात कडक लॉकडाऊन करण्यात आले. आपल्या सरकारनेही कोरोना विषाणूंचा सामना करण्यासाठी घेतलेल्या लॉकडाऊनच्या निर्णयामुळे शाळा- महाविद्यालये बंद ठेवण्यात आले. मुलांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला. या कोरोना वायरस संकटाचा सगळ्यात मोठा परिणाम हा शिक्षणावर झाला आहे. कोरोना संकट येण्याच्या आधीचे शिक्षण अतिशय वेगळे होते. मुलांना सहजपणे शाळांमध्ये जाऊन शिक्षण घेता येत होते. कोरोनामुळे मुलांना शाळेत जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाही. पालकांनाही मुलांच्या शिक्षणाची काळजी लागली आहे. शाळा बंद असल्यामुळे शिक्षण थांबवून तर चालणार नाही. मुलांचे भवितव्य ही गोष्टसुद्धा खूप महत्त्वाची आहे. मुलांना शाळेत जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही तर मग मुले शिक्षण घेणार कसे ? पुढील वर्गाचा अभ्यास कसा करणार ? शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन मुलांना कसे मिळणार ? असे अनेक प्रश्न मुले, पालक आणि शिक्षकांबरोबरच आपल्या सर्वांना पडलेले आहेत. कोरोना संकटाच्या आधी मुले आपल्याला शाळेमध्ये जाताना दिसत होती परंतु तीच मुले आता आपापल्या मोबाईल, लॅपटॉप, टॅब यांचा उपयोग करून अभ्यास करताना दिसतात. शाळा, कॉलेज बंद असताना ऑनलाईन शिक्षण हा चांगला पर्यायी मार्ग आपल्याकडे आहे.४

**४) ऑनलाईन शिक्षण म्हणजे काय ?**

गुरुकुल शिक्षण पद्धती आपली प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती आहे. यात ब्रह्मचर्य पालन करून गुरूघरी राहून गुरुंची सेवा करून ज्ञानार्जन करणे अपेक्षित आहे. आपल्या देशामध्ये एके काळी पालक आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगले संस्कार देण्यासाठी गुरुकुलमध्ये पाठवीत असत. वयाच्या ७ - ८ व्या वर्षापासून ते २४ वर्षापर्यंत विद्यार्थी तिथे शिक्षण घेत असे. त्याला गुरूकुलात पुस्तकी अभ्यासाबरोबरच अध्यात्मिक संस्कार आणि शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण दिले जात असे. शिक्षणाच्या या पद्धतीला ' गुरूकुल पद्धती ' म्हटले जाते.

इंग्रजी काळात नवे युग आले, नवी क्षितिजे दिसू लागली. आधुनिकता आल्यामुळे शिक्षणाच्या पद्धती बदलून इंग्रजी शाळा,महाविद्यालये आणि विद्यापीठे देशात स्थापन झाली. त्यामुळे देशातील सर्व विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यामुळे गुरूकुल पद्धती पूर्णपणे नाहीशी झाली. परंतु मागील पाच वर्षापासून आलेल्या इंटरनेट क्रांतीमुळे डिजिटल शिक्षणाची सुरुवात झाली आहे. विद्यार्थी घरबसल्या ऑनलाईन शिक्षण प्राप्त करीत आहे. यातच भर म्हणजे मागील वर्षी आलेली कोविड - १९ या जागतिक महामारीमुळे या एका वर्षात देशातील ऑनलाईन शिक्षण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. लहान मुलापासून ते मोठ्या मुलांचे पदवी,पद्व्युत्तर स्तरापर्यंतचे शिक्षण विद्यार्थी आज घरबसल्या ऑनलाईन स्वरूपाने प्राप्त करून घेत आहेत. आजची तरुण पिढी तंत्रज्ञानाचा उपयोग करून ते तंत्रज्ञान शिक्षण क्षेत्रामध्ये योग्यरीत्या वापरत आहेत. मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप, टॅब, रेडिओ, दूरदर्शन अशा माध्यमांच्या साह्याने गुगल क्लासरूम, झूम मिटींग, गुगल मीट अशा ऑनलाईन ॲपच्या साहाय्यानेअध्ययन - अध्यापन केले जाते.

ऑनलाईन एज्युकेशन म्हणजे दूरवर असलेल्या दोन माध्यमात परस्पर संवाद घडवून आणणे होय. जगाच्या कानाकोपऱ्यातील जनतेला एकमेकांशी संवाद घडवून आणणारी यंत्रणा म्हणजे 'ऑनलाईन एज्युकेशन' होय. ५

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

ऑनलाईन शिक्षणालाच डिजिटल शिक्षण, ई-लर्निंग असेही म्हणतात. सीबीटी (Computer Based training) आयबीटी (Internet Based Learning) डब्ल्यूबीटी (Web Based training ) असे ई लर्निंगचे समानार्थी शब्द आहेत.६

**५) ऑनलाईन शिक्षणाचे फायदे (Online Education Advantages)**

१) ऑनलाईन शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे ऑनलाईन शिक्षण घेताना किंवा एखादे लेक्चर चालू असताना आपण ते लेक्चर रेकॉर्ड करू शकतो. जेणेकरून पुन्हा अभ्यास करताना किंवा काही अडचण आल्यास किंवा एखादा मुद्दा आपल्याला कळला नाही तर ती रेकॉर्डिंग पुन्हा पुन्हा पाहून व्यवस्थित रीतीने समजून घेऊ शकतो.

२) ऑनलाईन शिक्षण प्रणाली सुरू झाल्यामुळे सर्व विद्यार्थी एका वर्गात बसविण्याची गरज राहिली नाही. त्यामुळे कोरोनासारख्या महामारीचे संकट टाळता आले. कोरोना संसर्गाची जी भीती ऑफलाईन माध्यमांमध्ये जाणवत होती ही भीती ऑनलाईन वर्गामुळे जाणवणार नाही. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये आपण सोशल डिस्टंसिंग योग्यरीत्या पालन करू शकतो.

३) ऑनलाईन एज्युकेशनमुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या, जगातील वेगवेगळ्या विषयातील तज्ज्ञ ऑनलाईन एज्युकेशनमुळे एकमेकांच्या संपर्कात येण्यास मदत झाली. 24 *7 शिक्षण सुरू झाले. ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लागली. विद्यार्थी एखादा मुद्दा कळला नाही तर शिक्षकांच्या मदतीने किंवा गुगलच्या मदतीने समजावून घेत आहेत.

४) ऑनलाईन शिक्षण सहज सोपे कुठे घेता येते. शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालयात जाण्याची कोणतीही आवश्यकता नसते. घरी बसल्यादररोज घराबाहेर निघणे आणि शाळा-महाविद्यालय पर्यंत पायी, सायकल अथवा इतर वाहनाने जाण्याची तसदी घेण्याची आवश्यकता नसते. तसेच या शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांचा सकाळी लवकर उठून टिफिन बनविणे, मुलांना शाळेसाठी तयार करणे व त्यांना शाळेत नेऊन सोडणे, हा देखील वेळ वाचत आहे. या ऑनलाईन शिक्षणामुळे आपली ऊर्जा, वेळ,आणि पैसा यांची बचत होते.

५) ऑनलाईन शिक्षणामुळे विविध प्रकारचे ऑनलाईन कोर्सेस उपलब्ध झाले.कोविडच्या काळात शिक्षक व विद्यार्थी यांना जोडून ठेवण्याचे ऑनलाइन शिक्षणाने महत्त्वाचे कार्य केले आहे.७

७) ऑनलाईन शिक्षणाचा आणखी एक महत्वाचा फायदा हासुद्धा आहे की, ऑनलाईन माध्यमातून आपण देशातीलच नव्हे तर परदेशातील शिक्षण कोणत्याही शिक्षणसंस्थेद्वारे किंवा कोणत्याही महाविद्यालयातील लेक्चर ऑनलाईन ॲपच्या मदतीने प्राप्त करू शकतो व ते लेक्चर अटेंड करू शकतो.

८) ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना मोबाईल,कम्प्युटर,लॅपटॉप हाताळणे शक्य झाले आहे व विद्यार्थी कमी वेळेमध्ये अशी डिजिटल उपकरणे हाताळायला शिकले आहेत, तसेच आजच्या तरुण पिढीला मोबाईल हाताळण्याची खूप आवड आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणासोबतच गेम खेळणे, चॅटिंग करणे किंवा इतर ॲप्स वापरणे हे देखील शक्य झाले आहे. अशा पद्धतीने ऑनलाईन शिक्षण विद्यार्थी आणि पालकांनासुद्धा चांगल्या प्रकारे वरदान ठरत आहे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**५) ऑनलाईन शिक्षणाच्या मर्यादा (Online Education Disadvantages)**

ज्याप्रमाणे प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात त्याप्रमाणेच ऑनलाईन शिक्षणाचे जितके फायदे आहेत त्याच प्रमाणामध्ये काही मर्यादाही (तोटे) आहेत. या मर्यादांमुळेच कदाचित ऑनलाईन शिक्षण सर्वांसाठी शाप ठरत आहे. ऑनलाईन शिक्षणाचे तोटे पुढील प्रमाणे-

१) ऑनलाईन शिक्षणामुळे गरीब-श्रीमंत अशी दरी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. काही पालक गरीब असल्याने त्यांना अँड्रॉइड महागडा मोबाईल घेणे परवडत नाही. त्यामुळे मला शिक्षणाच्या प्रवाहात जाता येत नाही. आपल्या सोबतचा वर्गमित्र सर्व सुविधा मिळाल्यामुळे ऑनलाईन शिक्षण घेत आहे. शिक्षणासाठी शाळेकडून मागितलेली फी भरत आहे. पण आपली परिस्थिती तशी नाही. वडिलांकडे मोबाईल नाही. शाळेचे शुल्क भरण्यासाठी पैसे नाहीत. केवळ परिस्थितीमुळे आपल्याला शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. ही नैराश्याची तीव्र भावना विद्यार्थ्यांना आत्महत्येच्या उंबरठ्यापर्यंत घेऊन जाऊ शकते. महाराष्ट्रातील बहुतांश विद्यार्थ्यांकडे मोबाईल नाहीत हे वास्तव अनेक तज्ज्ञांनी मांडले. मात्र सरकारने याचा फारसा विचार केलाच नाही आणि ऑनलाईन शिक्षणाचे धोरण पुढे रेटले. म्हणून बीड,नांदेड,८ सातारा,सांगली, अमरावती,नागपूर या जिल्ह्यात निरागस विद्यार्थ्यांनी न्यूनगंडापायी आत्महत्या केल्याच्या एकामागे एक घटना समोर आल्या.९ मार्च ते सप्टेंबर या सहा महिन्यात केरळ राज्यात तब्बल ६६ विद्यार्थ्यांनी केवळ ऑनलाईन शिक्षण मिळत नाही म्हणून आत्महत्या केली. ही परिस्थिती खूप विदारक आणि विचार करायला लावणारी आहे.१०

२) ऑनलाईन शिक्षणाचा सर्वात महत्वाचा तोटा म्हणजे शिक्षक वर्गामध्ये प्रत्यक्ष शिकवत असताना विद्यार्थ्यांकडे जसे लक्ष देतात तसे लक्ष ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून देता येणे शक्य नाही. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी लेक्चरकडे गांभीर्याने पाहतो की नाही? हे शिक्षकांच्या लक्षात येणे खूप खूप कठीण आहे. आपल्यातील बहुतांश विद्यार्थी हे ऑनलाईन शिक्षणाला गंभीरपणे घेत नाहीत. लेक्चर चालू असतानाही काही विद्यार्थी लेक्चरच्या मधून उठून जाणे, इतरांशी गप्पा मारणे किंवा गेम खेळणे इत्यादी गोष्टी करत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना पाहिजे तेवढे योग्य असे ज्ञान या माध्यमातून मिळू शकत नाही.

३) ऑनलाईन शिक्षणाचा आणखी एक तोटा म्हणजे जास्त वेळ मोबाईल, कंप्यूटर आणि लॅपटॉपच्या स्क्रीनटाईममुळे विद्यार्थ्यांना डोळ्याचा त्रास, मानसिक अनारोग्य, सामान्य झोपेवर परिणाम या परिणामांना सामोरे जावे लागत आहे. तसेच घरी बसून शिक्षण प्राप्त केल्यामुळे विद्यार्थ्यांना आपले शिक्षक, मित्र, मैत्रिणींशी बोलणे, खेळणे शक्य राहिले नाही, त्यामुळे आजचा विद्यार्थी कम्युनिकेशन मध्ये खूप मागे राहिले.

४) ऑनलाईन शिक्षण हे इंटरनेटवर आधारित आहे. त्यामुळे नेटवर्क प्रॉब्लेम हा केव्हाही येऊ शकतो. तसेच रिचार्ज संपला किंवा नेट पॅक संपला तर ऑनलाईन शिक्षण खंडित होते.

५) लहान वयामध्ये मुलांना ऑनलाईन शिक्षण मिळत असल्यामुळे मोबाईलसारख्या उपकरणांचा वापर करण्याची सवय लागली आहे. मुलाच्या हातात मोबाईल दिल्यावर प्रत्येक विद्यार्थी मोबाईलचा योग्य वापर करतो ! हे सांगणे कठीण आहे. मुलाच्या चारित्र्याला चुकीची दिशा देणाऱ्या आशयाची कमतरता नाही.अशा परिस्थितीत पालकही त्यांना स्मार्टफोन देण्यास टाळाटाळ करतात. ११

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**६) ऑनलाईन शिक्षण शिक्षक - विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या सूचना**

जून महिना उजाडला पण, शाळेची घंटा घणघणली नाही. गेल्या अनेक वर्षात अशी स्थिती पहिल्यांदाच निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या शाळा आता घंटेवर नाही, तर बटनावर उघडल्या आहेत. गूगल क्लासरूम, झूम मिटींग, गुगल मीट सारख्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षणाची गंगा वाहू लागली आहे. मुलांनीही शाळेच्या सूचना पटापट ते कॅच करत मोबाईल, लॅपटॉप, टॅब किंवा कम्प्युटरवर शाळेच्या वर्गांना हजेरी लावायला सुरुवात केली आहे. शिक्षक - विद्यार्थ्यांमध्ये एक स्वाभाविक प्रत्यक्ष असा संवाद असतो. तो या माध्यमात तितका चांगला साधला जाणार की नाही ? सतत मोबाइल स्क्रीन आणि कानात खोल घुमणारा आवाज त्यांना किती काळ सहन होणार? समोर हेडफोन लावून बसलेल्या मुलाचं ' हेड ' वर्गातच आहे ना ! हे पालकांना कसं समजणार? या प्रश्नाची उत्तरे काळाच्या ओघातच मिळतील पण तूर्त केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ऑनलाईन शिक्षणासाठी शिक्षक, राज्य सरकार, पालक आणि विद्यार्थ्यांना सूचना केल्या आहेत.

**अ) शिक्षकांना सुचना**

१)ऑनलाईन शिक्षणात रियल टाईम शिक्षणाचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा यासाठी व्हाट्सअप, गूगल क्लासरूम सारख्या सुविधा वापरून शिक्षण देण्यात यावे.

२) मुलांना कोठेही, केव्हाही शिक्षण घेता यावे यासाठी 'दीक्षा' वरील शैक्षणिक साहित्य त्याचबरोबर टीव्ही, रेडिओवर शिकविल्या जाणाऱ्या वर्गाबाबत मुलांना मार्गदर्शन करणे.

३) शिक्षकाने काही कंटेंट ऑफलाईन ही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

४) मुख्याध्यापकांनी डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

५) विद्यार्थ्यांचा स्क्रीन टाईम वाढू नये यासाठी पूर्वप्राथमिक वर्गांना ३० मिनिटांपेक्षा जास्त व्हिडीओ दाखवू नये. बालवाडीसाठी ३० ते ४५ मिनिटांचे दोन सत्रे घ्यावेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक साठी ३० ते ४५ मिनिटांची चार सत्रे घ्यावेत.१२

६) विद्यार्थ्यांना सूचना देण्यासाठी ऑनलाईन ग्रुप तयार करावा.

७) विद्यार्थ्यांचे फोटो, व्हिडीओ ऑनलाईन शेअर करू नयेत.

८) कन्टेन्ट तयार करताना एका पानावर पाच ओळी आणि २४ चा फॉन्ट वापरावा.

**ब) राज्य सरकारांना केलेल्या सूचना**

१) ऑनलाईन शिक्षण सर्व स्तरातील विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचेल हे पाहण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे.

२) जेथे इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन आदी सुविधा नाहीत त्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कोणत्या पर्याय साधनाचा वापर करावा लागेल हे राज्य सरकारांनी पहावे.

३) राज्यातील टीव्ही, रेडिओ चॅनल्सच्या माध्यमातून शिक्षण द्यावे. ओपन सोर्सच्या माध्यमातून कन्टेन्ट उपलब्ध करून द्यावे.

४) डिजिटल लर्निंग वातावरणाची निर्मिती करावी.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**क) पालकांना सुचना**

१) मुलांना अधिक वेळ कंप्यूटर, मोबाईल, टीव्ही समोर बसवू नये.

२) कंप्यूटर, टीव्ही खुल्या जागी ठेवा आणि मुलांच्या वेळेवर नियंत्रण ठेवा.

३) सायबर सुरक्षेबाबत विशेष काळजी घ्यावी.

४) मुलांची आसनव्यवस्था योग्य पद्धतीने करा.

**ड) विद्यार्थ्यांना सूचना**

१)ऑनलाईन शिक्षणाबरोबरच रोज पाठ्यपुस्तकांचे वाचन करावे.

२) ऑनलाईन वर्गाबरोबरच इतर कलात्मक, प्रयोगशील वर्गाचे शिक्षण घ्यावे.

३) स्क्रीन टाईम दोन तासांपेक्षा जास्त होईल असे करू नये.

४) इंटरनेटवर कोणतीही माहिती भरतांना पालकांची परवानगी घ्यावी.१३

**७) समारोप**

ऑनलाईन शिक्षण ही काळाची गरज आहे. सध्याच्या जागतिक महामारीच्या कठीण परिस्थितीत अध्यापनाची प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी शिक्षक ऑनलाईन पर्यायांचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न करत आहे. अनेक अडथळे पार करत नवतंत्रज्ञान आत्मसात करत आहेत. शाळा बंद आहेत पण शिक्षण सुरू आहे. ध्येयमंत्र जपत ऑनलाईन शिक्षणाचे विविध मार्ग अनुसरले जात आहेत. ऑनलाईन अध्यापन करताना गूगल क्लासरूम, झूम मिटींग, गुगल मीट, व्हाट्सअप या पर्यायांच्या माध्यमातून मुलांना अभ्यासात खिळवून ठेवताना दीक्षा, ई-बालभारती, खान अकादमी इत्यादी ॲप्स आणि तंत्रस्नेही शिक्षकांनी बनवलेले अगणित शैक्षणिक ॲप्स देवदुतासारखे मदतीला आलेले आहेत. लहान मुलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी मराठी - इंग्रजी शब्दकोश, मराठी - इंग्रजी व्याकरण शिकण्यासाठी पाढे, गणित, प्रश्नपेढी, विज्ञान, कोडी, सामान्यज्ञान, इंग्रजी संभाषणासाठी उपयुक्त असे हे ॲप्स आहेत. शाळेत मुलांच्या घेता याव्यात म्हणून ई- प्रश्नपेढी कशी तयार करावी, विविध विषयांचे मूल्यमापन कसे करावे, शिक्षकांनी मुलांना उपयोगी पडणारे व्हिडिओ, पीपीटी, ऑनलाइन टेस्ट असे ई - साहित्य तयार केले आहे. आता मुलं स्वाध्याय स्वतः स्मार्टफोनवर सोडवू शकतात. तसेच पालकांना आपल्या मुलांच्या प्रगतीची माहिती या ॲप्समुळे मिळण्यास मदत होते.१४ केंद्राने शिक्षक, राज्य, पालक आणि विद्यार्थी यांना केलेल्या सूचनांनुसार अंमलबजावणी केली तर आताच्या काळात शाळा, कॉलेज बंद असल्यामुळे ऑनलाईन हा खूप चांगला पर्यायी मार्ग आपल्याकडे आहे.

**८) संदर्भ**

*माहिती पुस्तिका - सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे द्वारा प्रकाशित पृ. १*

*लॉकडाऊनची भीषणता! औरंगाबादजवळ रेल्वे रुळावर झोपलेली १६ मजूर चिरडून ठार, ऑनलाइन लोकमत ८ मे २०२०*

*अकोप गॅब्रिएल्यान - कोरोना ही मानवतेची परीक्षा orfonline.org ७ सप्टेंबर २०२०*

*संकपाळ प्रवीण - कोरोना काळातील शिक्षण https : //nibhandhmarathi. Com*

*https ://wwwcomputerguru.online,September23,2021*

*https://hi.m. Wikipedia org*

*ऑनलाईन शिक्षण पद्धती ऑनलाइन शिक्षण फायदे तोटे //wwwcomputer.online, September23, 2021)*

*ऑनलाईन शिक्षणासाठी मोबाईल नसल्याने विद्यार्थिनीची आत्महत्या - नांदेड मधील हृदयद्रावक घटना दे. लोकसत्ता २० जून २०२१*

*अरेरे, ऑनलाईन शिक्षणासाठी मोबाईल न मिळाल्याने दहावीच्या विद्यार्थ्यांची गळफास घेऊन आत्महत्या - दैनिक लोकसत्ता, दिनांक १५ जुलै २०२०*

*ऑनलाईन शिक्षण: शाप की वरदान https://khasmitra.com September16,2021*

*तत्रैव*

*प्रज्ञाता - डिजिटल एजुकेशन मार्गदर्शिका,निर्देशन एवं परामर्श निदेशालय, अकादमिक, शोध एवं प्रशिक्षण,उत्तराखण्ड, हिन्दी रूपांतरण, राज्य शैक्षिक प्रबंधन एवं प्रशिक्षण संस्थान उत्तराखण्ड देहरादून पृ. १८*

*ऑनलाइन शाळा शिक्षक विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या सूचना- मनीषा फाळके, महाराष्ट्र टाइम, १२ जून २०२०*

*ऑनलाइन लर्निंग सुकर होण्यासाठी - जगदीश इंदलकर, महाराष्ट्र टाइम्स. कॉम , ३ जून २०२०*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*